# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/८६०
दिनांक : - 8 AUG 2017

**विषय :-** प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,वास्तुशास्त्र ,व्यवस्थापनशास्त्र व एमसीए पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे रिपोर्टिंग करण्यासाठी दिनांक १०.८.२०१७ रोजी अतिरिक्त संधी देणेबाबत....

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तिस-या फेरीपर्यंत अलॉट झालेले प्रवेश संबंधित विद्यार्थ्याने काही कारणास्तव प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) जाऊन कागदपत्र पडताळणी करून व सीट ॲक्सेप्टन्स फी भरून मात्र प्रत्यक्ष संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकले नाहीत किंवा एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करू शकले नाहीत अशा उमेदवारांनी त्यांना मिळालेल्या संस्थेत प्रवेश निश्चितीची संधी देण्यासंदर्भात विनंती अर्ज संचालनालयास प्राप्त होत आहेत. अशा उमेदवारांना प्रवेश ॲलॉट झालेल्या संस्थेत संबंधित Allot झालेल्या seat type ची जागा रिक्त असेल आणि सदर संस्थने ती अद्यापपर्यंत रिक्त ठेवली असेल तर उमेदवाराला त्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करून त्यास प्रवेशाची अतिरिक्त संधी देण्याच्या दृष्टीकोनातून अशा प्रवेशाला मान्यता देण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. जे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या,दुस-या किंवा तिस-या प्रवेश फेरीत संस्थेत ॲलॉट झालेल्या प्रवेशाबाबत, एआरसी मध्ये विहीत केलेले Seat Acceptanceशुल्क भरूनही त्यांच्या अंतिम Allotment नुसार प्रत्यक्ष Alloted संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करू शकले नाहीत असे उमेदवार संबंधित संस्थेत जाऊन जर जागा रिक्त असतील आणि उमेदवारास ॲलॉट झालेले Seat Type उपलब्ध असेल व संस्थेने उमेदवारास त्या रिक्त जागेवर प्रवेश देण्याचे निश्चित केले तर अशा प्रकरणी प्रवेश देता येऊ शकेल.
२. ज्या उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या,दुस-या किंवा तिस-या प्रवेश फेरीनंतर त्यांच्या अंतिम Allotment Institute Status नुसार संस्थेत ॲलॉट झालेल्या प्रवेशाबाबत विहीत केलेले सीट ॲक्सेप्टन्स शुल्क भरलेले नाही आणि एआरसी मध्ये जाऊन कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया पूर्णही केलेली नाही असे उमेदवार संबंधित संस्थेत जाऊन जर जागा रिक्त असतील आणि उमेदवारास ॲलॉट झालेले Seat Type उपलब्ध असेल व संस्थेला उमेदवारास त्या जागेवर अशा प्रकरणी प्रवेश देता येऊ शकेल.
३. मात्र असे करताना संस्थेने Admission Portal मधून संस्थेच्या Login मधून मेसेज करून मेसेज बॉक्सद्वारे संचालनालयास Admin यांना मेसेज करून त्यांच्या संस्थेत उपस्थित झालेल्या उमेदवाराची Seat Type availbale असल्याचे व संस्था संबधित उमेदवारास प्रवेश देण्यास तयार असल्याचा मेसेज पाठवल्यावर या उमेदवाराचा प्रवेश निश्चित करण्यासाठी मान्यता देण्याची कार्यवाही झाल्यानंतर असा प्रवेश Confirm करता येईल.

४. तसेच ज्या उमेदवारांनी एआरसी मध्ये जाऊन कागदपत्र पडताळणी न करताच सीट ॲक्सेप्टन्स शुल्क न भरता थेट संस्थेत उपस्थित झाले असतील अशा उमेदवारांकडून रुपये १०००/- आकारून आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे नावे विद्यार्थ्यांच्या यादीसह त्यांचा एकत्रित धनाकर्ष (डी डी) पाठवतील.

५. अशा प्रकारे थेट संस्थेत जाऊन प्रवेश निश्चिती करण्यासाठी अंतिम संधी फक्त एक दिवस म्हणजे दिनांक १०.८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल.विद्यार्थ्यांनी ही संधी कोणत्याही कारणास्तव गमावल्यास त्यांना पुनश्च कोणत्याही सबबीखाली अशी संधी मिळणार नाही.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रत : कार्यासन अधिकारी, आय्.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सूचना विदयार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात.

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर तसेच त्यांच्या अधिनस्त येणा-या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१७/ ३००४
दिनांक :- - 9 AUG 2017

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या सर्व शासकीय/अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, व व्यवस्थापनशास्त्र एमसीए पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेशाचे रिपोर्टिंग करण्यासाठी दिनांक १०/०८/२०१७ रोजी अतिरिक्त संधी देणेबाबत संचालनालयाच्या सदरील पत्रात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.